# आरे ते वरळीपर्यंतच्या मेट्रो गाड्यांच्या चाचणी फेऱ्यांना लवकरच सुरुवात

गोरेगाव : सध्या आरे-बीकेसीदरम्यान मेट्रो गाड्यांच्या चाचणी फेऱ्या सुरू आहेत. पण आता आरे ते वरळीपर्यंत मेट्रो गाड्यांची चाचणी फेऱ्यांना येत्या आठवड्यात सुरुवात होणार आहे. रूळ, इतर यंत्रणेची चाचणी करण्यासाठी मेट्रो गाडी वरळीपर्यंत नेण्यात येणार आहे. मुंबईतील मेट्रो ३ ही पहिली भुयारी मार्गिका आहे. ३३.५ किमी लांबीच्या या मार्गिकेचे काम सध्या वेगाने सुरू आहे. लवकरच आरे-बीकेसी असा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल केला जाणार आहे. ही पहिली भुयारी मेट्रो मार्गिका असल्याने 'एमएमआरसी'कडून (Mumbai Metro Rail Corporation (MMRC) अत्यंत काळजीपूर्वक चाचणी करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी दिली.